महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे-४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

सुधारीत प्रकटन

क्र.पुविमं/शाखा क/आवेदन/6738
पुणे-४११००५
दिनांकः-23/12/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा/विद्यालय,
जिल्हा-पुणे, अहमदनगर, सोलापूर.

**विषयः**- सन-२०२५ या वर्षी इ.१० वी च्या परीक्षेला प्रविष्ट झालेल्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककलेचे सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतच्या प्रस्ताव देण्याबाबत...

**संदर्भ** :- १- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,शासन निर्णय संकीर्ण २०१६/प्र.क्र.202/एसडी-२ दि.२४/११/२०१७

२- क्र.रा.मं/परीक्षा-७/२७२७ पुणे दिनांक ०९/०७/२०२४ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सर्व माध्यमिक शाळा मुख्याध्यापकांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10 वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या संदर्भ क्र. 1 मधील शासन निर्णय संदर्भ क्र.2 च्या पत्रानुसार शास्त्रीय कला,चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबत आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

०१. सर्व माध्यमिक शाळांनी संदर्भ क्र १ मधील शा.निर्णयानुसार विद्यार्थ्यामार्फत प्रस्तावाचा स्विकार करून सदरचा प्रस्तावर विभागीय मंडळ यांच्याकडे पाठविण्याची कार्यवाही करण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे **तक्ता अ** नुसार करण्यात यावी.

<u>तक्ता अ</u>

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| ०१ | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे | १५ डिसेंबर |
| ०२ | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे | १५ जानेवारी |

०२. चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनी एलिमेंटरी व इंटरमिजिएट या दोन्ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसेच दि.०९/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील 52 संस्थांचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

०३. शास्त्रीय कला यामध्ये दोन वेगवेगळया संस्थांमधून विद्यार्थ्यांनी परीक्षा उत्तीर्ण केल्या असल्यास दोन्ही संस्था शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या यादीमध्ये असणे आवश्यक आहे. दोन संस्थामधून परीक्षा दिल्या असल्यास ३री/५वी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या संस्थेने आधीच्या अन्य संस्थांकडील (शासन निर्णयात नमूद असलेल्या) प्रमाणपत्र प्रमाणित करणे आवश्यक आहे.

अ. **शासन निर्णयानुसार** ३री/५वी परीक्षा **ही विद्यार्थ्याने ७ वी ते १० वी** या इयत्तांमध्ये शिकत असतांना उत्तीर्ण केलेली असावी.

**ब.** शासन निर्णयानुसार गुणपत्रक 1 ते 3/1 ते 5 अशा सर्व परीक्षांचे प्रस्तावासोबत सादर

करणे आवश्यक आहे. तसेच प्रमाणपत्र किमान 3 –या/5 व्या परीक्षेचे आवश्यक राहील.

क. कला सवलत गुणांसंदर्भात शाळांनी शासन निर्णयातील तरतूदीनुसार परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यासाठी पालक/विद्यार्थी/संस्थांनी सहकार्य करावे. विद्यार्थी/पालक संस्था यांनी थेट विभागीय मंडळाशी संपर्क न साधता शाळेकडे प्रस्ताव सादर करावा व शाळेने विहीत मुदतीत विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करावा.

ड. सोबतचे परिशिष्ट अ प्रपत्रावर संबंधित संस्थांनी संस्थेचा शिक्का व स्वाक्षरी करावी. तसेच प्रस्ताव परिपूर्ण असल्याबाबत सोबतचे हमीपत्र भरून दयावे.

०४. कोणताही पात्र विद्यार्थी कला सवलतीच्या अतिरिक्त गुणांपासून वंचित राहणार नाही, तसेच याबाबत पालक/विद्यार्थी/संस्था यांना कोणतीही अडचण येणार नाही अथवा तक्रारी प्राप्त होणार नाहीत, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

०५. विद्यार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्तावच सादर करावेत. प्रस्ताव अपूर्ण असल्यास, गुणदान न मिळाल्यास शाळाप्रमुख म्हणून आपली जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

०६. एखादा विद्यार्थी क्रिडा, शास्त्रीय कला (गायन, वादन, नृत्य) चित्रकला व लोककलेतील सहभाग यापैकी एका पेक्षा जास्त क्षेत्रात प्राविण्य प्राप्त करीत असेल तरी कोणत्याही एकाच क्षेत्रासाठी सवलतीचे गुण जे उच्चतम आहेत तेच घेण्यासाठी विद्यार्थ्यास शाळेमार्फत प्रथम प्राधान्याने कळविण्यात यावे. व कोणत्याही एकाच कला प्रकारासाठी एकच प्रस्ताव सादर केला जाईल याची शाळा प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

०७. तथापि एखाद्या विद्यार्थ्याचे एकापेक्षा जास्त कला कीडा चे प्रस्ताव सादर केल्याचे निदर्शनास आल्यास ज्या प्रकारासाठी सवलतीचे गुण जे उच्चतम आहेत ते गुण ग्राहय धरण्यात येतील याची नोंद घ्यावी.

०८. तसेच संदर्भात नमूना कमांक 5 वरील परिपत्रकानुसार कला, क्रिडा प्रस्ताव मंडळाकडे सादर करताना छाननी शुल्क म्हणून रु 25/– प्रति विद्यार्थी चलनाद्वारे भरणाकरून प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

०९. अपूर्ण प्रस्ताव सादर केल्याचे आढळल्यास ते रद्द करण्यात येतील व त्याप्रित्यर्थ जमा केलेले छाननी शुल्क परत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१०. परिपूर्ण प्रस्ताव सादर करताना पत्रात प्रस्तावांची एकूण संख्या शास्त्रीकला, चित्रकला प्रकारानिहाय नमूद करून एकूण रक्कम लिहिणे आवश्यक आहे. याची नोंद घ्यावी. खालील उदाहरणाप्रमाणे प्रस्तावासोबतच्या पत्रात नोंद करणे.

## तक्ता ब

| | | |
|---|---|---|
| चित्रकला | १. प्रस्ताव X रू.२५/- | २५/- |
| गायन | १. प्रस्ताव X रू.२५/- | २५/- |
| वादन | १. प्रस्ताव X रू.२५/- | २५/- |

११. निर्धारीत दिनांकापूर्वी शाळेच्या पत्रासोबत लावून त्यावर शाळेचा सांकेतिक क्र. नमूद करून मंडळाकडे प्रस्ताव सादर करावे.

सूचना–१- सदर प्रस्ताव बैठक क्रमांकनिहाय क्रमवार लावून बंच तयार करून सादर करावेत

२- प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रस्तावावर बैठक कमांक नमूद करावा व प्रस्तावासोबत प्रवेशपत्र जोडण्यात यावे.

३- चित्रकला पात्र प्रस्ताव, शास्त्रीय कला, लोककला असे प्रस्तावांचे स्वतंत्रपणे बंच तयार करून मंडळाकडे सादर करावेत. त्यासंबधीचे शाळा प्रमुखांचे मुखपत्र पात्र विद्यार्थी यादी खालील नमून्यात प्रत्येक बंचसोबत स्वतंत्रपणे सादर करावी.

४- चित्रकला,शास्त्रीयकला प्रस्तावांची प्रमाणपत्रे मुख्याध्यापकांनी प्रमाणित करूनच सोबत जोडावीत.

| अ.क. | बैठक कमांक | विद्यार्थ्याचे नाव | इलिमेंटरी प्राप्त ग्रेड | इंटरमिजीएट प्राप्त ग्रेड | लोककला | शास्त्रीय कला | द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे–४११००५

प्रत माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीसाठी

**A.** विभागीय शिक्षण उपसंचालक

**B.** शिक्षणाधिकारी(माध्यमिक) पुणे, अहमदनगर, सोलापूर.

# "परिशिष्ट अ"

संस्थेचे नाव :- ................................................................................................

पत्ता :- ................................................................................................

सांस्कृतिक कार्य विभाग नोंदणी क्रमांक:- ........................................ दिनांक:- / /२०२

## प्रमाणपत्र

१. प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ........................................................................ हा/ही (शास्त्रीय कला प्रकारचे नाव )........................................................................................ या कलाप्रकारातील ................................................ परीक्षा ......................... गुणांसह ........(श्रेणी.............) उत्तीर्ण झाला / झाली आहे सदर परीक्षा उत्तीर्ण होताना तो / ती ........................ इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता /होती.

२. प्रमाणित करण्यात येते की, कुमार / कुमारी ........................................................................हा/ही मागील ................... वर्षातील ................................... या लोककला प्रकारात एकूण ................................ ................................. प्रयोगात सहभागी झाला / झाली आहे.

सदर विद्यार्थ्यास / विद्यार्थीनीस मार्च .......................................मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १० वी) परीक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे

स्थळ :-

दिनांक :-

अध्यक्ष / सचिव
संबधित संस्थेचे नाव
(रबरी शिक्क्यासह)

टिप- १ किंवा २ या पैकी लागू नसेल ते खोडावे

# " परिशिष्ट ब "

दिनांक- / /२०२

## प्रमाणपत्र

A. प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी ............................................ हा / ही इंटरमिजीट ड्राईंग ग्रेड परीक्षा सन ......................मध्ये..........................श्रेणीने उत्तीर्ण झाला / झाली आहे सदर परीक्षा उत्तीर्ण होताना तो / ती ........................... इयत्तेमध्ये शिक्षण घेत होता / होती.

B. प्रमाणित करण्यात येते की, कुमार/कुमारी.................................................................................................हा/ही इलिमेंटरी ड्राईंग ग्रेड परीक्षा सन ....................................मध्ये उत्तीर्ण झाला / झाली आहे

सदर विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस मार्च ........................... मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता १०वी) परीक्षेत सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरविण्यात येत आहे

स्थळ :-

दिनांक :-

संचालक,
कला संचालनालय, मुंबई
(रबरी शिक्क्यासह )

# ह मी प त्र

शाळा सांकेतांक ..........................................................................

या प्रमाणपत्राव्दारे हमी देतो की, शास्त्रीय कला/चित्रकला बाबतचे मंडळाचे दि.०५/१२/२०२४ व दि. २३/१२/२०२४ रोजीचे प्रकटन आम्ही वाचले असून, या विद्यालयामार्फत सादर करण्यात आलेले शास्त्रीय कला/ चित्रकला यांचे एकूण................................ प्रस्ताव शासन निर्णयानुसार पूर्ण तपासून सादर करण्यात आले आहेत. सदर प्रस्तावामध्ये कुठल्याही प्रकारची त्रुटी नाही यानंतरही काही त्रुटी अभावी विदयार्थ्यांस गुण प्राप्त न झाल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी आमच्या विदयालयाची राहील.

दिनांक :- / /२०२५

कला/चित्रकला शिक्षक
स्वाक्षरी

मुख्याध्यापक
स्वाक्षरी व शिक्का

# मुख्याध्यापकाचे शिफारसपत्र

जा. क्र.:-
दिनांक :-

प्रति,

मा. विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे–०५

**विषय :-** शास्त्रीयकला/चित्रकला/लोककला विषयातील सवलतीचे वाढीव गुण मिळणेबाबत.....

**महोदय,**

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या शाळेतील/विद्यालयातील कुमार/कुमारी .......................... ........................................................ हा/ही माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) मार्च-२०२५ बैठक कमांक .......................... ने प्रविष्ठ झाला असून, त्याने/तिने खालील कला प्रकारात परीक्षेत प्राविण्य मिळविलेले आहे.

| कला प्रकार | परीक्षा स्पर्धेचे नाव | प्रमाणपत्र देणा–या संस्थेचे नाव व पत्ता | नोंदणी कमांक | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी/कमांक | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

सदर विद्यार्थी/विद्यार्थीनीच्या अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्राची सत्यता पडताळून पाहिलेली आहे. त्यानुसार त्याला/तिला................. सवलतीचे वाढीव गुण देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

मुख्याध्यापक शिक्का व स्वाक्षरी

**टिप:-** एखादा विद्यार्थी/विद्यार्थीनी एकापेक्षा जास्त कला विषयक परीक्षा यांमध्ये किंवा क्रिडा प्रकारांमध्ये प्राविण्य प्राप्त करीत असेल तर कोणत्याही एकाच कला/क्रिडा/चित्रकला प्रकारात सवलतीचे वाढीव गुण देण्यास पात्र ठरेल.

# शास्त्रीय कला / चित्रकला / लोककला प्रस्तावाबाबात.........

1 विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव जमा करण्याची मुदत – 15/12/2024

शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव जमा करण्याची मुदत – <u>15/01/2025</u>

आहे.

3 प्रस्ताव हे बोर्डामध्ये समक्ष घेवून यावे कोणीही **टपालाद्वारे पाठवू नये.**

4 सदर प्रस्तावची **छाननी शुल्क प्रति विद्यार्थी 25/–** आहे आणि ते विभागीय मंडळात किंवा चलनाद्वारे बॅकेमध्ये भरावे.

5 सदरचे प्रस्ताव हे **बैठक कमांकानुसारच** लावून द्यावे. आणि सोबत **हॉलटिकीट** लावण्यात यावे.

6 विहित मुदतीनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही याची दक्षता सर्वांनी घ्यावी.

# चित्रकला प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे

1 शाळेचे पत्र

2 विद्यार्थ्यांची **बैठक क्रमांकनिहाय** यादी

3 विद्यार्थ्याचे प्रवेशपत्र

4 मुख्याध्यापकाचे हमीपत्र

5 मुख्याध्यापकाचे शिफारसपत्र

6 प्रत्येक विद्यार्थ्याचे **परिशिष्ठ ब**

7 **इलिमेंटरी** व **इंटरमिडीऐट** दोन्ही प्रमाणपत्र आवश्यक

8 प्रस्तावातील सर्व कागदपत्रे प्रमाणीत (Attested ) करणे अनिवार्य आहे

## शास्त्रीय कला / लोककला प्रस्तावासोबत जोडावयाची कागदपत्रे

1 शाळेचे पत्र

2 विद्यार्थ्यांची बैठक कमांकनिहाय यादी

3 विद्यार्थ्याचे प्रवेशपत्र

4 मुख्याध्यापकाचे हमीपत्र

5 मुख्याध्यापकाचे शिफारसपत्र

6 प्रत्येक विद्यार्थ्याचे **परिशिष्ठ अ (संबंधित संस्थेचा शिक्का** असणे अनिवार्य आहे)

7 विद्यार्थी किमान 3 री किंवा कमाल 5 वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे

8 किमान 3 परीक्षा– **प्रारंभिक, प्रवेशीका प्रथम आणि प्रवेशीका पुर्ण**

9 कमाल 5 परीक्षा– **मध्यमा प्रथम व मध्यमा पुर्ण**

10 उपरोक्त परीक्षा **इ. 7 वी ते इ. 10** वर्गात शिकत असतांना उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे.

11 **3 री** किंवा **5 वी** परीक्षा **एप्रिल 2021** किंवा त्यापुर्वी उत्तीर्ण प्रस्ताव **अपात्र** व **जुन 2021** ला किंवा त्यानंतर उत्तीर्ण असलेले विद्यार्थी **पात्र** ठरतील

12 प्रस्तावातील सर्व कागदपत्रे प्रमाणीत (Attested ) करणे अनिवार्य आहे